CNR No.MHNS160006622021 संं.फौ.ख.क्र.४००/२०२१
सरकार विरुद्ध मेहमुद शेख.

| MHNS160006622021 | दाखल दिनांक | :- | ०४/०६/२०२१ | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | ०४/०६/२०२१ | |
| | न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०७/२०२६ | |
| | कालावधी | :- | वर्ष, | महिने, | दिवस |
| | | | ०५ | ०१ | ०६ |

**चांदवड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,न्यायालय क्रं. ०१ यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी- एस. एस. छल्लाणी)**

(घोषीत दिनांक १०/०७/२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४००/२०२१**

**निशाणी क्र.२३**

**गु.र.नं. २९/२०२१**

**राज्य उत्पादन शुल्क, कळवण.**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन मार्फत,**<br>राज्य उत्पादन शुल्क,<br>कळवण विभाग, नाशिक. |
| **अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता** | श्री. एन. पी. मोरे |
| **आरोपींचे नावे** | **महेमुद अय्युब शेख,**<br>वय:- ३१ वर्ष, व्यवसाय :<br>रा. डावखर नगर, चांदवड,<br>ता. चांदवड, जि. नाशिक. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | श्री. एस. डी. जाधव, |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २४/०२/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २४/०२/२०२१ |
| दोषारोपत्राचा दिनांक | ०४/०६/२०२१ |

CNR No.MHNS160006622021

**सं.फौ.ख.क्र.४००/२०२१**
**सरकार विरुद्ध  मेहमुद शेख.**

| | |
|---|---|
| दोषारोपत्र (चार्च) ठेवल्याचा दिनांक | ०४/०६/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २४/०९/२०२१ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपींचा तपशील**

| | |
|---|---|
| आरोपींची श्रेणी | १ |
| आरोपींचे नाव | **महेमुद अय्युब शेख** |
| अटक तारीख | २४/०२/२०२१ |
| जामीनवर सोडल्याची तारीख | दिनांक २४/०२/२०२१ |
| अधिनियम | महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये, |
| निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | निर्दोष मुक्त |
| दिलेली शिक्षा. | निरंक |
| सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी. सी. | निरंक |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | दिपक निवृत्ती आव्हाड | (निशाणी क्र. १४) |
| अ.सा.क्र.२ | आण्णा परशराम आहेरे | (निशाणी क्र. २०) |

CNR No.MHNS160006622021

संं.फौ.ख.क्र.४००/२०२१
सरकार विरुद्ध मेहमुद शेख.

ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी

अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | – | – |
| २. | – | – |

ब. बचाव

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

क. कोर्ट निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१२ | दोषारोपपत्र |
| २ | नि.क्र.२२ | ३१३(१)(ब) |

ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | – | (१) देशी दारु प्रिन्स संत्रा १८० मि. ली. क्षमतेच्या एकुण २२ सिलबंद बाटल्या.<br>(२) दोन प्लॉस्टीक मग व चाररिकामे ग्लास<br>असे एकुण १२०४/– रुपयाचा मुद्देमाल |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक : – १०/०७/२०२६)

**०१.** आरोपीं विरुध्द प्रस्तुतचा खटला कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या प्रकरणाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :**

**०२.** दिनांक २४/०२/२०२१ रोजी फिर्यादी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक येथील कार्यालयात हजर असतांना मा. दुय्यम निरीक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत त्यांना माहीती मिळाली की, एक इसम त्याच्या ताब्यात अवैद्यरित्या विनापरवाना देशी दारु जवळ बाळगुण त्याची लोकांना पिण्याकरिता अवैधरित्या चोरुन विक्री करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाली व दुय्यम दुय्यम निरीक्षक यांनी नमुद दोन पंचांना बोलावुन त्यांना मिळालेल्या बातमीची माहीती देवुन पंचनामा करण्यासाठी हजर राहण्यास सांगितले. त्यावर पंचांनी होकार दिल्यावरुन फिर्यादी त्यांचे स्टाफसह बातमीच्या ठिकाणी छापा टाकाला असता आरोपीच्या ताब्यात मुद्देमाल पावती प्रमाणे एकुण १२०४/– रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर त्यांनी आरोपीला त्याचे नाव गाव विचारुन त्यांना जप्त मुद्देमालासह पो.स्टे.ला आणले व तेथे फिर्यादीने सरकारच्यावतीने फिर्याद दिली. त्या अनुषंगाने आरोपीचेविरुध्द अपराध क्र.२९/२०२१ दाखल केला.

०३. तपासी अधिकारी आर. एस. सोनवणे यांनी घटनेची पूर्ण चौकशी करुन जप्त मुद्देमालामधुन रासायनिक विश्लेषणासाठी दोन १८० मिलीची सीलबंद बाटली घेवुन रासायनिक विश्लेषण अहवालासाठी रासायनिक प्रयोगशाळा नाशिक येथे पाठविण्यात आली. तसेच तपासानंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

०४. या न्यायालयाने आरोपीविरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा, अन्वये गुन्हयाचा तपशिल **नि.क्र.१२** नुसार ठेवला जो आरोपीला त्यांच्या मातृभाषेत वाचुन दाखविण्यात आला व समजावुन सांगण्यात आला. त्यावर आरोपीला गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांच्यावर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. उपलब्ध पूराव्यात आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपीचा फौ.प्र.सं.च्या कलम ३१३(१)(ब) प्रमाण जबाब **नि.क्र.२२** वर नोंदविण्यात आला व त्यात आरोपीने त्यांच्यावर खोटे प्रकरण दाखल केल्याचे कथन केले.

०५. खटल्याचे अंतिम निकालाचे दृष्टीने निम्नलिखित विचाराधीन प्रश्न उद्भवतात. खाली नमुद केलेल्या कारणावरुन त्याचे निघत असलेले निष्कर्ष त्यांच्या समोर नोंदविलेले आहेत.

| अनु क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २४/०२/२०२१ रोजी आरोपीने स्वतःचे ताब्यात देशी दारु प्रिन्स संत्रा १८० मि. ली. क्षमतेच्या एकुण २२ सिलबंद बाटल्या विनापरवाना विक्री करीता बाळगतांना मिळुन | ..... **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | आला ? | |
| २. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

**कारणमिमांसा**

**०६.** आरोपीविरुध्द दोषारोपीत गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने तक्रारकर्ता दिपक निवृत्ती आव्हाड (अ.सा.क्र.१) यांना **निशाणी क्र. १४,** पंच साक्षीदार (अ.सा.क्र.२) आण्णा परशराम आहेरे याला **निशाणी क्र. २०** वर तपासले. अभियोग पक्षाचा पुरावा **नि.क्र.१** वरील आदेशावरुन बंद करण्यात आला.

**विचाराधिन प्रश्न क्र.१ साठी –**

**०७.** अभियोग पक्षाने तपासलेला साक्षीदार क्रं. १ याने दिनांक २४/०२/२०२१ रोजी गुप्त माहिती मिळाल्यावरुन दोन पंचासह छापा टाकण्याकरीता गेलो त्यावेळी आरोपीच्या ताब्यातून २२ सिलबंद बाटल्या प्रत्येकी १८० मिली च्या मिळून आल्या त्या ठिकाणी श्री. आर. एस. सोनवणे यांना पंचासमोर पंचनामा केला व सरकार तर्फे त्याने फिर्याद दिली होती असे कथन केले आहे. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास आला मात्र आरोपी पक्षास सहाय्य होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर मिळून आला नाही.

**०८.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ आण्णा आहेर हे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामाचे पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले. त्याने त्याच्या उलटतपासात ब–याच प्रकारणात पंच म्हणून काम केले असल्याची बाब मान्य केली आहे. त्याने पंचनामा कधी सुरु केला व कधी संपविला याची वेळ माहीत नसल्याचे कथन केले आहे.

**०९.** अभियोग पक्षाने याप्रकरणात तपासी अधिकारी व इतर साक्षीदारांना

तपासलेले नाही. दुसरा पंच साक्षीदाराचे साक्ष अभिलेखावर नोंदविले नाही. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षेस पुरक ईतर स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष या प्रकरणात नोंदविली नसल्याने जप्त मुद्देमाल हा दारु बंदी गुन्हयाचा माल होता व तो आरोपीकडुनच जप्त करण्यात आला होता, याबाबत सबळ पुरावा अभिलेख पटलावर आलेला नाही.

**१०.** घटनास्थळ व जप्ती पंचनामा संशयाच्या पलीकडे सिध्द न झाल्याने तसेच जप्त मुद्देमाल दारु बंदी गुन्हयाचा माल होता व तो आरोपीकडुनच जप्त केला होता ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयाच्या पलीकडे सिध्द केलेली नाही. अभियोग पक्षाने पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांची साक्ष या प्रकरणात नोंदविली नाही.

**११.** महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये कलम ६५(ई) नुसार शिक्षा पात्र असलेला गुन्हा आरोपीविरुध्द सिध्द करण्यासाठी खालील बाबी अभियोग पक्षाला सिध्द करणे आवश्यक आहे :-

**अ)** कोणत्याही व्यक्तीने कायद्याचे, नियमाचे, आदेशाचे, परवाना पत्राचे, अनुज्ञापत्राचे, अधिकार पत्राचे उल्लंघन करुन,

**ब)** कोणताही मादक पदार्थ (अफु आणि हेम्प वगळुन) विक्री करणे, खरेदी करणे किंवा बाळगणे, हे कृत्य गुन्हा ठरुन सदर कायद्याच्या प्रावधाना नुसार शिक्षेस पात्र ठरते.

**१२.** सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातुन जप्त करण्यात आला ही बाब अभियोग पक्ष सिध्द करु शकले नाही. रासायनिक विश्लेषकाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे. परंतु जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातुन जप्त करण्यात आला होता ही महत्वाची बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलिकडे

सिध्द केलेली नाही. सदरचे प्रकरण ५ वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही आणि म्हणुन अभियोग पक्ष आरोपी विरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करु शकले नाही. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा घेण्यास पात्र आहे. अशा परिस्थितीत आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. परिणामी मी वरील संपूर्ण परिस्थितीचा विचार करुन विचाराधीन प्रश्न क्र.१ यास माझे निष्कर्ष नकारार्थी दिले आहे. म्हणुन मी विचाराधीन प्रश्न क्र.२ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **महेमुद अय्युब शेख** यांची महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) च्या शिक्षापात्र अपराधातुन फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते व त्यांना मोकळे सोडण्यात येते. |
| २. | आरोपीनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी व मा. वरिष्ठ न्यायालयांनी निर्देश दिल्यानंतर हजर होण्याकरीता रु.१५,०००/- चे बंधपत्र व जामीन दयावा व त्यास आजपासुन सहा महिण्यानंतर रद्द समजण्यात यावे. |
| ३. | जप्त मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क विभाग नाशिक यांच्याकडे अपील कालावधीनंतर त्याची कायदयानुसार विल्हेवाट लावण्याकरिता पाठवण्यात यावा. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
SUMIT
SURESHCHANDRA
CHHALLANI
Date: 2026.07.10
16:51:06 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
चांदवड,

**दिनांक :-** १०/०७/२०२६

CNR No.MHNS160006622021

सं.फौ.ख.क्र.४००/२०२१
सरकार विरुद्ध मेहमुद शेख.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे***<br>*लघुलेखक* (ग्रेड–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | १०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | १०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | १०/०७/२०२६ |